दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
बुलडाणा, शनिवार, दि.१५ फेब्रुवारी २०२५
वर्ष : ०४, अंक : १८५
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com




## थोडक्यात

### महिलेचे म्हाडा भवनात अनोखे आंदोलन

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१४, मुंबई :** म्हाडाच्या वांद्रे येथील म्हाडा भवनातील दुसऱ्या मजल्यावरील मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळाच्या सहमुख्य अधिकाऱ्याच्या कार्यालयात एका महिलेने अनोखे आंदोलन केले. आपल्या काही मागण्यांसाठी या महिलेने ५० रुपयांच्या नोटांच्या माळा घालून अधिकाऱ्यांविरोधात घोषणाबाजी केली. इतकेच नव्हे तर या महिलेने ६,६५० रुपये उधळले. तिने दुसऱ्या मजल्यावरून उडी मारण्याचाही प्रयत्न केला, मात्र सुरक्षा रक्षकांनी वेळीच तिला रोखून म्हाडा भवनाबाहेर नेल्याने अनुचित प्रकार टळला. दरम्यान खेरवाडी पोलिसांनी नोटा जप्त केल्या असून या महिलेविरोधात तक्रार दाखल करण्याची कार्यवाही दुरुस्ती मंडळाकडून सुरू होती.

शुक्रवारी दुपारी अडीच-तीनच्या दरम्यान दुरुस्ती मंडळाचे सहमुख्य अधिकारी उमेश वाघ यांना भेटण्यासाठी ही महिला आली होती. मात्र वाघ प्रकल्प पाहणी दौऱ्यावर असल्याने त्यांची भेट झाली नाही. त्यानंतर या महिलेने गळ्यात ५० रुपयांच्या नोटांची माळ घालून अधिकाऱ्यांविरोधात घोषणाबाजी केली. त्यामुळे एकच गोंधळ उडाला. या गोंधळाची माहिती मिळताच सुरक्षा रक्षकांनी दुसऱ्या मजल्यावरील सहमुख्य अधिकाऱ्यांच्या कार्यालयाकडे धाव घेतली. या महिलेला अडविण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर या महिलेने कार्यालयात नोटा उधळल्या आणि दुसऱ्या मजल्यावरून उडी मारण्याचा प्रयत्न केला. मात्र तेवढ्यात सुरक्षा रक्षकांनी तिला अडवले.

त्यानंतर तिला म्हाडाच्या आवरात आणले आणि त्यानंतर ती महिला तेथून निघून गेली. मात्र ही महिला नेमकी कोण होती, तिचे अधिकाऱ्यांकडे काय काम होते, तिची नेमकी मागणी काय होती याची कोणतीही माहिती मिळू शकली नाही.

# ४ महिन्यांत ३ विधानसभा निवडणुकांमध्ये काँग्रेसचा पराभव...आता काय ??

गेल्या चार महिन्यांत हरियाणा, महाराष्ट्र आणि दिल्लीत झालेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये काँग्रेस पक्षाने अत्यंत निराशाजनक कामगिरी केली आहे. त्यानंतर आता काही महिन्यांतच बिहारमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत. यासाठी आता काँग्रेसने पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. दरम्यान, बिहारमध्ये काँग्रेस राष्ट्रीय जनता दलाच्या नेतृत्वाखालील महाआघाडीचा भाग म्हणून आगामी विधानसभा निवडणुका लढवेल.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी गेल्या काही आठवड्यात विविध कार्यक्रमांनिमित्त दोनदा बिहारचा दौरा केला आहे. असे असले तरी, बिहारमधील काँग्रेसची संघटनात्मक अजूनही डळमळीत असल्याचे दिसत आहे. पक्ष नेतृत्वाने २०१७ पासून बिहार प्रदेश काँग्रेस समितीची कार्यकारी समिती स्थापन केलेली नाही. मात्र, अखिल भारतीय काँग्रेस समितीचे प्रमुख मल्लिकार्जुन खरगे यांनी डिसेंबर २०२२ मध्ये अखिलेश सिंग यांना बिहारचे प्रदेशाध्यक्ष म्हणून नियुक्ती केली होती. फ

काँग्रेसमधील अनेक नेत्यांनी द इंडियन एक्सप्रेसला सांगितले की, बिहार काँग्रेसमध्ये गेल्या आठ वर्षांपासून प्रमुख प्रदेश काँग्रेस समिती अस्तित्वात नाही. बिहार काँग्रेसच्या एका वरिष्ठ नेत्याने द इंडियन एक्सप्रेसला सांगितले की, त्यांनी प्रदेश काँग्रेस समिती अस्तित्वात नसल्याची बाब पक्षाच्या वरिष्ठांना कळवली होती, परंतु त्याला कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. मी अनेक नेत्यांना सांगितले होते की, जर आपल्याला विधानसभा निवडणुकीत चांगली कामगिरी करायची असेल तर बिहारमध्ये पक्ष संघटना मजबूत करावी लागेल. पण मला यावर कोणतेही उत्तर मिळाले नाही.बिहार काँग्रेसचे माजी उपाध्यक्ष



ब्रजेश पांडे म्हणाले की, प्रदेश काँग्रेस कार्यकारिणी समिती लवकरच स्थापन केली जाईल.

**अनेक वर्षांपासून बिहारमध्ये काँग्रेसची कामगिरी निराशाजनक**

गेल्या अनेक वर्षांपासून बिहारच्या अनेक निवडणुकांमध्ये काँग्रेसची कामगिरी निराशाजनक राहिली आहे, बिहारमध्ये लालू प्रसाद नेतृत्वाखालील राष्ट्रीय जनता दलाचा प्रभाव आहे. त्यामुळे बिहारमध्ये काँग्रेस पक्ष त्यांच्यावर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे.

दरम्यान, २०२० मध्ये झालेल्या बिहार विधानसभेच्या निवडणुकीत काँग्रेसने ७० पैकी १९ जागा जिंकल्या होत्या, तर त्यांचा ज्येष्ठ मित्रपक्ष राजदने १४४ पैकी ७५ जागा जिंकून सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास आला होता. असे असले तरी १४३ सदस्य असलेल्या बिहार विधानसभेत एनडीएने १५ जागा जास्त मिळल्या होत्या. यानंतर खराब स्ट्राइक रेटसाठी काँग्रेसवर खूप टीका झाली होती.

**लोकसभा निवडणुकीतील कामगिरी...**

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत, काँग्रेसने लढवलेल्या नऊ जागांपैकी तीन जागा जिंकल्या होत्या. यामध्ये राजदने लढवलेल्या २३ पैकी चार जागा जिंकल्या होत्या, तर त्यांचा मित्रपक्ष सीपीआयने (एमएल) तीन पैकी दोन जागा जिंकल्या होत्या. दुसरीकडे एनडीएने ४० पैकी ३० जागा जिंकल्या होत्या.

ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये होणारी बिहार विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर असल्याने, काँग्रेस नेतृत्वावर आता राजदसोबत सन्मानपूर्वक युती करण्याचा आणि त्यांच्या प्रदेश काँग्रेसला बळकटी देण्यासाठी दबाव वाढत आहे.

# शक्तिपीठ महामार्ग समर्थन कृती समितीकडून महागावात चक्काजाम

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१४, यवतमाळ :** नागपूर ते गोवा (पवनार ते पत्रादेवी) शक्तिपीठ द्रुतगती महामार्गासाठी शेतजमीन संपादित करण्याची प्रक्रिया सुरू झाल्यामुळे शेतकरी सैरभैर झाले आहेत. या महामार्गला शेतकऱ्यांचा विरोध नाही.मात्र शेतकऱ्यांच्या शेताचे योग्य मूल्यमापन करून अधिग्रहित जमिनीसाठी एकरी किमान दोन कोटी रुपये भाव देण्यात यावा, यासह विविध मागण्यांसाठी शक्तिपीठ महामार्ग समर्थन कृती समितीकडून महागाव येथे आज शुक्रवारी चक्काजाम आंदोलन करण्यात आले. आंदोलनामुळे वाहतूक विस्कळीत झाली होती.

शक्तीपीठ महामार्गामुळे महागाव तालुक्यातील अनेक गावातील शेतकरी विस्थापित व भूमिहीन होणार आहेत. तरीही, शक्तिपीठ महामार्गाला विरोध नाही, परंतु सरकारने शेतकऱ्यांच्या संपूर्ण मागण्यांचा विचार करून निर्णय घ्यावा, अशी मागणी करत नागपूर-तुळजापूर महामार्गावर चक्काजाम आंदोलन केले गेले. सार्वजनिक बांधकाम विभागाने २८ फेब्रुवारी २०२४ रोजी याबाबत राजपत्र प्रकाशित केले. यात महागाव



तालुक्यातील नेमक्या कोणत्या गावातील शेतकऱ्यांच्या शेतजमिनी संपादित करण्यात येणार आहेत याचा तपशिल दिला आहे. महामार्गासाठी संपादित करण्यात येत असलेली महागाव तालुक्यातील शेतकऱ्यांची जमीन ओलिताची व सुपीक आहे. शेतजमीन अधिग्रहण केल्यास शेतीचे विभाजन होणार आहे. १० आर पेक्षा कमी जमीन शेतकऱ्याकडे शिल्लक राहत असेल तर शासनाने त्याचा मोबदला शेतकऱ्यास द्यावा, अशी मागणी आंदोलकांनी केली.

भूसंपादन प्रक्रियेमध्ये रेडिरेकनर दर किंवा मागील तीन वर्षामध्ये झालेल्या खरेदी-विक्री व्यवहारानुसार येणारे हेक्टरी दर अत्यंत कमी आहेत. रेडिरेकनर दरांमध्ये सन २०१८ पासून वाढच झालेली नाही, त्यामुळे हे दर बाजारभावाच्या तुलनेत अत्यंत कमी आहेत. त्यामुळे अधिग्रहित शेतजमिनीचा एकरी दोन कोटी रूपये मोबदला देण्याची मागणीही शेतकऱ्यांनी केली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून वर्षभरापूर्वी प्रसिद्ध झालेल्या राजपत्रामध्ये आणि प्रत्यक्ष क्षेत्रफळामधील वस्तुस्थितीत मोठी तफावत आहे. त्यामुळे शेत मालकासमक्ष संपादित शेतजमिनीची प्रत्यक्ष मोजणी करून फेर अधिसूचना प्रसिद्ध करण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. शक्तीपीठ महामार्गाच्या दोन्ही बाजूला सर्विस रोड व जुन्या वहिवाटीच्या रस्त्यावर बोगदा, पूल करून द्यावा अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. शेतजमिनीच्या मोजणीपूर्वी शेतकऱ्यांना दिला जाणारा मोबदला जाहीर करून अधिकृत सहीनिशी ग्रामपंचायत कार्यालयात यादी प्रकाशित करण्यात यावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली.

या चक्काजाम आंदोलनात उटी, कलगाव, खडका, अंबोडा वाघनाथ, पोहंडुळ, नेहरूनगर आदी गावांमधील शेकडो शेतकरी सहभागी झाले होते. आंदोलनामुळे नागपूर nbsp तुळजापूर महामार्गावरील वाहतूक बराच वेळ खोळंबली होती. दोन्ही बाजूने वाहनाच्या रांगा लागल्या होत्या. पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

# अक्षराज बातमीचा इम्पॅक्ट ! अखेर शिळफाटा महापे रोडवरचा कचरा प्रशासनाने उचलला...

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१३, शिळफाटा(ठाणे) :** शेवटी प्रशासनाला अक्षराजच्या बातमीची दखल घ्यावीच लागली. बातमी लागताच शिळफाटा-महापे रोडवरचा कचरा हा उचलण्यात आला. शिळफाटा ते महापे मार्गावर २० दिवसापासून कचरा हा उचलण्यात येत नव्हता. त्यामुळे रस्त्यावर कचऱ्याचे साम्राज्य वाढले होते. येता जाताना नागरिकांना दुर्गंधीचा सामना करावा लागत होता.

त्यामुळे तेथील शिळठाकूर पाडा रहिवासांना नाहक त्रास सहन करावा लागत होता. घनकचरा उचलण्यासाठी ठाणे महानगरपालिका कोटी रुपये खर्च करत असते. मग हा घनकचरा का उचलला जात नाही. खरं तर हा मतदारसंघ आमदार राजेश मोरे आणि खासदार श्रीकांत शिंदे यांच्या मतदारसंघात संघात येतो. २० ते २५ दिवस हा कचरा तिथे जमा होत होता



याचं कारण असं आहे की कॉन्ट्रॅक्टदारकडे किंवा ठाणे महानगरपालिका कडे कर्मचारी नसल्यामुळे २० दिवसाचा कचरा ढिगारा जमा करत होते आणि जेसीबीच्या साह्याने डंपर मध्ये भरत होते. २० ते २५ दिवस कचरा हा तिथेच पडून राहायचा तोपर्यंत तेथील नागरिकांना हा नाहक त्रास सहन करावा लागत होता. दिवा प्रभाग समितीचे अधिकारी संजय जाधव यांना फोन करून सुद्धा नागरिकांनी माहिती दिली असताना सुद्धा कानाडोळा करत करत होते.

आज उचलतो उद्या उचलतो असे उडवा उडवी चे उत्तरे ते देत होते. शिळठाकूर पाडा रहिवाशांनी मागणी आयुक्ताकडे केली.अशा कामचोर अधिकाऱ्याला निलंबित करण्यात यावे अशी मागणी करण्यात आली.

अक्षराज मीडियावर शिळफाटा-महापे रोडवर जमा झालेला २० दिवसाचा कचरा हा मीडियावर दाखवण्यात आला. ही बातमी महाराष्ट्रात वाऱ्यासारखी पसरली. तेव्हा कुठे प्रशासनाला जाग आली. आणि शेवटी प्रशासनाने दोन तासाच्या आत हा कचरा उचलला. शिळठाकूर पाडा येथील रहिवाशांनी अक्षराज मीडियाचे आभार मानले. प्रशासनाने कचरा उचलल्यामुळे त्यांचीही आभार रहिवाशांनी मानले.

# तायक्कांदोत सर्वोत्तम युवा खेळाडू आर्यन व सारा यांचा जाहीर सत्कार

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१४, मुंबई :** तायक्कांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, मुंबई या राज्य संघटनेच्या वतीने पुणे येथे होणाऱ्या पाचवी राज्यस्तरीय ओपन तायक्कांदो स्पर्धेचे १४ ते १६ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत आयोजन करण्यात आले आहे.

सदर स्पर्धेत २०२४-२०२५ या वर्षातील राज्यस्तरीय उत्कृष्ट खेळाडू, ऊत्कृष्ट प्रशिक्षक, उत्कृष्ट संघटना व उत्कृष्ट स्पर्धा आयोजकांचा सत्कार करण्याचा निर्णय राज्य संघटनेच्या वतीने १५ फेब्रुवारी २०२५ होणार आहे..या स्पर्धे दरम्यान मुंबई उपनगर जिल्ह्यातील वॉरिअर तायकवॉदो अकॅडमी, घाटकोपरच्या खेळाडूचा जाहीर सन्मान करून गौरविण्यात येणार आहे.

**पूमसे (Poomsae) गटातील सन्मानित खेळाडू**





सर्वोत्तम युवा खेळाडू (Junior - Male)
**आर्यन संदिप येवले**
**(मुंबई उपनगर)**

सर्वोत्तम युवा खेळाडू (Junior - Female)
**सारा संदिप येवले**
**(मुंबई उपनगर)**

तायक्वॉदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, मुंबई या संघटनेचे अध्यक्ष- अविनाश बारगजे, महासचिव- मिलिंद पठारे, सचिव- सुभाष पाटील, खजिनदार - व्यंकटेश करारा या संघटनेच्या पदाधिकारी यांच्या तर्फे महाराष्ट्रातील इतर खेळाडू व प्रशिक्षक यांचे देखील सन्मान करण्यात येणार आहे. सर्व खेळाडू व प्रशिक्षक यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

# संपादकीय



## सौंदर्याची खाण, बॉलिवूडची शान

आज १४ फेब्रुवारी, बॉलिवूडची मरलीन मनरो, सौंदर्याची खाण, बॉलिवूडची शान, चित्रपट सृष्टीतीलच नव्हे तर भारतातील सर्वात सुंदर महिला असे जीचे वर्णन केले जाते त्या मधुबाला यांचा आज जन्मदिन. आज त्यांची ९२ वि जयंती. १४ फेब्रुवारी १९३३ रोजी दिल्लीच्या एका पश्तून कुटुंबात जन्मलेल्या मधुबाला यांचे मूळ नाव मुमताज बेगम जहाँ देहलवी. असे म्हणतात की मधुबाला यांच्या जन्मानंतर एका व्यक्तीने तिच्या बाबत असे भविष्य वर्तवले होते की ती तिच्या आयुष्यात खूप ख्याती मिळवेल. पैसा अडका, धन संपत्ती मिळवेल पण तिचे आयुष्य अतिशय दुःखी असेल. या भविष्यावर विश्वास ठेवून तिचे वडील तिला मुंबईला घेऊन आले. वयाच्या नवव्या वर्षी म्हणजे १९४२ साली मधुबाला यांनी बेबी मुमताज या नावाने चित्रपटात भूमिका करण्यास सुरुवात केली. बाबुराव पटेल आणि डॉ सुशीलाराणी पटेल या दाम्पत्याचा मधुबाला वर विशेष लोभ होता त्यांनीच तिला मधुबाला हे नाव दिले. बालवयातच चित्रपटात काम करू लागल्याने मधुबाला या शाळेत जाऊ शकल्या नाहीत त्यामुळे त्यांना इंग्रजी येत नसे मात्र उर्दू भाषा येत होती. चित्रपटात भूमिका करण्यास सुरवात केल्यावर मात्र तिने इंग्रजीवर चांगले प्रभुत्व मिळवले. तिचे वडील कडक शिस्तीचे असल्याने ती कधीही चित्रपटाच्या प्रीमियरला उपस्थित राहत नसे. १९४७ साली आलेल्या निलकमल या चित्रपटात ती पहिल्यांदा अभिनेत्री म्हणून झळकली. याच वर्षी तिचा आणखी एक चित्रपट रिलीज झाला. पुढच्या वर्षी म्हणजे १९४८ साली तिचा अमर प्रेम नावाचा चित्रपट आला या सर्व चित्रपटात राज कपूर हे तिचे नायक होते. यानंतर बॉम्बे टॉकीजचा महल नावाचा चित्रपट आला हा चित्रपट सुपर डुपर हिट ठरला. यानंतर मात्र मधुबाला यांनी मागे वळून पाहिले नाही. अशोक कुमार, दिलीपकुमार, देवानंद या त्या काळातील आघाडीच्या अभिनेत्यांसह तिने भूमिका केल्या. अल्पावधीतच त्या बॉलिवूडच्या आघाडीच्या अभिनेत्री बनल्या. त्यांनी आपल्या करियरमध्ये ६६ चित्रपटात भूमिका केल्या. बॉलिवूडचे पहिले सुपरस्टार दिलीपकुमार यांच्यावर त्या एकतर्फी प्रेम करत असत. मुघले आझम चित्रपटाच्या शूटिंगच्या दरम्यान त्यांनी दिलीपकुमार यांच्याशी लग्न करण्याची इच्छा बोलून दाखवली मात्र दिलीपकुमार यांनी लग्नास स्पष्ट नकार दिला. त्यानंतर त्यांनी गायक किशोरकुमार यांच्याशी विवाह केला. मधुबाला या किशोरकुमार यांच्या चौथ्या पत्नी होत्या. किशोरकुमार यांच्या बरोबरचे लग्न ही बाब दोघांसाठी कसेतरी जगण्यासाठी केलेली तडजोड होती त्यामुळेच दोघांचे जास्त पटत नसे. मधुबाला यांना ह्दय रोग होता आणि १९५० पासून त्यांच्यावर उपचार चालू होते. पण तिने ही गोष्ट सर्वांपासून लपवून ठेवली होती. तिची तब्येत बरी नसतानाही त्यांनी निर्माते दिग्दर्शकांचे नुकसान होऊ नये म्हणून साइन केलेले चित्रपट पूर्ण केले. या चित्रपटात असे कोठेही जाणवत नव्हते की त्या आजारी आहेत. ह्दय रोगासोबत त्यांना असा एक आजार होता की ज्या आजाराने शरीरात प्रमाणापेक्षा अधिक रक्त तयार होत असे व तिच्या नाकातून व तोंडातून रक्तस्त्राव होत असे. इतक्या दुर्धर आजारातही तिने चित्रपटात काम करणे सुरूच ठेवले. मुघले आझम या चित्रपटातील एका दृश्यात तिला दोरखंडाने बांधले होते पण तिने तब्येत बरी नसतानाही ते सहन केले. ती म्हणायची अनारकलीची भूमिका करण्याची संधी पुन्हा मिळणार नाही. ती इतकी प्रोफेशनल होती की आपले काम अतिशय तन्मयतेने करत असत. प्रसंगी जेवण झाले नाही तरी चालेल, थर्ड क्लासने प्रवास करावा लागला तरी चालेल पण काम वेळेच्या वेळी पूर्ण करण्याचा तिचा आग्रह असे. तिच्या याच कामाच्या निष्ठेमुळे ती महान अभिनेत्री बनली. अमेरिकेच्या थिएटर आर्टस या जगप्रसिद्ध मासिकेने तिचा जगातील सर्वात मोठी अभिनेत्री म्हणून गौरव केला होता. तिच्या सौंदर्याची जादूच अशी होती की बघणारा हरखून जायचा. पण हेच आरस्पानी सौंदर्य तिच्यासाठी मात्र शापित ठरले. वयाच्या अवघ्या ३६ व्या वर्षी त्यांनी जगाचा निरोप घेतला. २३ फेब्रुवारी १९६९ साली त्यांनी जगाचा निरोप घेतला. मधुबालाला व्हीनस ऑफ स्क्रीन असे म्हटले जाते मात्र तिच्या याच आरस्पानी सौंदर्याला अल्पायुष्याचा शाप होता. आज त्या जाऊन ५६ वर्ष झाले मात्र तिच्या सौंदर्याची आणि अभिनयाची जादू आजही कायम आहे.

**सौंदर्याची खाण बॉलिवूडची शान असलेल्या मधुबाला यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!**

# ‘व्हॅलेंटाईन डे’चे अवाजवी स्तोम !

गेल्या काही वर्षांत व्हॅलेंटाईन डेचे स्तोम भारतात भलतेच माजले आहे. चॉकलेट, भेटवस्तू यांची निर्मिती करणाऱ्या कंपन्या आपली उत्पादने खपवण्यासाठी या दिवसांत नाना शक्कल लढवताना दिसतात. टीव्ही मालिकांमध्ये सुद्धा व्हॅलेंटाईन डेचाच फिवर असतो. वृत्त वाहिन्यांचे प्रतिनिधीही यानिमित्ताने तरुणांशी याच विषयावर हितगुज साधताना दिसतात. चित्रपट आणि मालिकांत काम करणारे अभिनेते आणि अभिनेत्री यंदाचा व्हॅलेंटाईन कसा साजरा करणार याबाबतचे सविस्तर वर्णन आपल्या सामाजिक माध्यमाच्या अकाऊंटवरून प्रसारित करतात. प्रेमकथेवर आधारित असलेले चित्रपट निर्मात्यांकडून खास या दिवसांत प्रदर्शित केले जातात. मित्रपरिवारामध्ये आपल्या प्रियकराला किंवा प्रेयसीला काय भेटवस्तू द्यावी, व्हॅलेंटाईन दिनानिमित्त कुठे फिरायला जायचे याचे नियोजन सुरु असते. हे सर्व पाहिल्यावर आपल्यालाही एखादी गर्लफ्रेंड किंवा बॉयफ्रेंड असावा असे अन्य तरुण तरुणींनाही वाटू लागते आणि त्यादृष्टीने त्यांची विचारप्रक्रिया सुरु होते. 'प्यार किया नाही जाता, हो जाता हैं' मात्र व्हॅलेंटाईन दिनानिमित्त तयार करण्यात आलेला गुलाबी माहोल कुणाच्या तरी प्रेमात पडण्यासाठी प्रवृत्त करू लागतो. परिणामी या एक दिवसाच्या निमित्ताने निर्माण झालेली भावना सुद्धा काही काळासाठीच टिकते. व्हॅलेंटाईन फीवर उतरला की वास्तवाचे भान होते. व्हॅलेंटाईन दिनाच्या निमित्ताने मुलींच्या भावनांचा गैरफायदा घेणारे महाभागही गल्लोगल्ली टपलेले असतात. दरवर्षी कितीतरी मुली या वासनांधांना बळी पडतात. क्षणिक सुखाला भुलून चुकीचे निर्णय घेतात आणि स्वतःचे आयुष्य उध्वस्त करतात. यामध्ये आईवडिलांची बदनामी होते ती वेगळीच.

तिसर्या शतकात रोम येथे व्हॅलेंटाईन नावाचा एक पाद्री (प्रीस्ट) होता. त्या काळातील क्लॉडीयस २ नावाच्या राजाने एक नियम लागू केला की, बायका-मुले



असलेल्या पुरुषांपेक्षा अविवाहित पुरुष कुशल सैनिक असतात; त्यामुळे युवा मुलांनी विवाह करू नये. व्हॅलेंटाईनला हे अयोग्य वाटले आणि त्याने राजाच्या नियमाचे पालन न करता लपूनछपून जोडप्यांची लग्ने लावणे सुरु ठेवले. व्हॅलेंटाईनने राजाचा आदेश न पाळल्याने तो क्रोधीत झाला आणि त्याने व्हॅलेंटाईनला ठार मारण्याचा आदेश दिला. रोमच्या कारागृहात असताना व्हॅलेंटाईन कारागृहातील तुरुंगाधिकार्याच्या तरुण मुलीच्या प्रेमात पडला.मृत्यूपूर्वी त्याने तिला एक पत्र पाठवले आणि त्यात शेवटी तुझ्या व्हॅलेंटाईनकडून असे लिहिले. तेव्हापासून १४ फेब्रुवारीला प्रेयसीला पत्र लिहून शेवटी 'तुझा व्हॅलेंटाईन' लिहिण्याची प्रथा तरुण वर्गात पडली. काहींच्या मते १४ फेब्रुवारी हा व्हॅलेंटाईनचा मृत्यूदिन आहे तर काहींच्या मते पाचव्या शतकाच्या शेवटी पोप जीलेसियसने १४ फेब्रुवारी या दिवसाला सेंट व्हॅलेंटाईन डे म्हणून घोषित केला. ज्याचा संबंध पुढे बऱ्याच वर्षांनी प्रेमाशी जोडण्यात आला.

मध्यंतरीच्या काळात व्हॅलेंटाईन डे च्या निमित्ताने शाळा-महाविद्यालयांतील नवोदित प्रेमी युगुले बागांमध्ये, तळी, नद्या आणि समुद्र किनारी, रस्त्यालगतच्या बाकड्यांवर, बस आणि रेल्वे स्थानकांवर गळ्यात गळे घालून प्रेमाच्या आणा-भाका खाताना दिसून येत, पुढे पुढे तर यांचे धाडस वाढत गेले आणि नको नको ते प्रकार घडत गेले. याबाबतची तक्रार काही सामाजिक संघटनांना मिळाल्यावर त्यांनी या प्रेमाच्या एक दिवशीय चाळ्यांच्या विरोधात थेट मोहीम हाती घेतली. याला जसा काही मंडळींकडून विरोध झाला तसा काहींकडून सकारात्मक प्रतिसादही मिळाला. सलग ४-५ वर्षे ही मोहीम राबवल्याचा चांगलाच परिणाम होऊन आजमितीला हे प्रमाण बऱ्यापैकी घटलेले दिसते. एका सर्वेक्षणानुसार सुमारे ३० टक्क्यांहून अधिक मुले मुलींशी लैंगिक संबंध ठेवण्यासाठी हा दिवस साजरा करतात. गर्भनिरोधक साधने बनवणार्या आस्थापनाच्या मतानुसार इतर दिवसांच्या तुलनेत या दिवशी गर्भनिरोधकांची विक्री अधिक होते. अर्थातच, अविवाहित मुले-मुली या दिवशी लैंगिक संबंध ठेवतात. याचा परिणाम म्हणून पुढे अनेक अविवाहित मुलींना गर्भपात करावा लागतो. हिंदु धर्मात लग्नापूर्वी लैंगिक संबंध ठेवणे निषिद्ध मानले गेले आहे.

व्हॅलेंटाईन दिनानिमित्त खास डिस्काउंट देणाऱ्या ऑनलाईन साईट्सवर चॉकलेट आणि भेटवस्तूंसोबत दरवर्षी गर्भनिरोधक साधनांवरसुद्धा डिस्काउंट दिले जात होते. किशोरवयीन मुले-मुली आपल्या प्रिय व्यक्तीला महागड्या भेटवस्तू देण्यासाठी पैसे कुटून आणतात हे कुणी विचारात घेते का ? मैत्रिणीला व्हॅलेंटाईन गिफ्ट देण्यासाठी वडिलांच्या पाकिटातून पैसे चोरल्याच्या, आईचे दागिने किंवा घरातील महागडी वस्तू परस्पर विकल्याच्या बातम्या या दिवसांत छापून येतात. गुन्हेगारी कृत्य करण्यास प्रवृत्त करणाऱ्या, अनैतिक कृत्यास प्रोत्साहन देणाऱ्या आणि तरुणांना क्षणाचे सुख देऊन दीर्घकाळाचा भ्रमनिरास देणाऱ्या व्हॅलेंटाईन डेचा एव्हढा उहापोह कशासाठी ?

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

# व्यापारी संकुल धूळखात पडून..! कित्येक वर्षापासून लिलावं प्रक्रिया झालीच नाही

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.१३, कुंडलवाडी (नांदेड) :** शहरातील कुंडलवाडी परिसरात नगरपालिकेने काही वर्षाखाली अतिक्रमण मोहीम राबविली होती. त्यानंतर या भागात व्यापारी संकुल उभारण्यात आले. हे संकुल उभारून मोठ्या उत्साहात उद्घाटन करून सुमारे पाच वर्षांचा कालावधी लोटला आहे.

लाभार्थी ठरविण्याबाबतचा ठरावही मासभेत करण्यात आला आहे. मात्र, ते योग्य रक्कम ठरत नसल्याने संकुलातील गाळयांचा लिलाव न झाल्याने सर्व गाळे धूळखात पडून आहेत. त्यामुळे नगरपालिकेचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. या गाळयांचा लिलाव करण्याची गरज व्यक्त होत आहे. मोकळ्या झालेल्या जागेवर दुमजली टोले जंग असे



व्यापारी संकुल उभारण्यात आले आहे यात नगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. व्यापारी संकुल उभारण्यासाठी नगरपालिकेने करोडो रुपये खर्च केले आहेत. त्यानंतर गाळ्यांचे वाटप न झाल्याने नगरपालिकेला या गाळयांपासून कोणतेही उत्पन्न मिळत नाहीये.

या गाळ्यांचा लिलाव केल्यास अनामत रक्कम आणि दरमहा मिळणार्या भाड्यातून नगरपालिकेला नियमित उत्पन्न मिळू शकते,परंतु त्याकडे प्रशासनाकडून दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप होत आहे. नगरपालिका परिसरात अनेक लहान व्यावसायिक रस्त्यावर उभे राहून व्यवसाय करतात. त्यांना हे गाळे देण्याची मागणी होत आहे.

गाळ्याची अनामत रक्कम नुतन जिल्हाधिकारी योग्य दरात लिलाव केल्यास संपूर्ण गाळे उपयोगात येतील. त्यासाठी नुतन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी या मुद्ध्याकडे वैयक्तिक लक्ष द्यावे, व्यवसायिकांची अडचणी दूर करून योग्य रक्कमेस लिलाव प्रक्रिया झाल्यास या व्यावसायिकांना हक्काचे दुकान मिळणार आहे. तसेच यात नगरपालिकेचे उत्पन्नही वाढेल.

## धोरण...

विचार करा एकदा
फसलो ते कितीदा
सहज सोपा नसतो
आरक्षणाचा वायदा

कायदेपंडित अनेक
मांडून बसलेत धंदा
चालू ठेवती दुकान
बाजार जरीही मंदा

साठमारी लावू मस्त
आपला पाहे फायदा
कोर्टामध्ये टिकणारा
कराया हवा कायदा

फासेटाकतीलं खास
मनस्थिती करे द्विधा
आंदोलन बदलेदिशा
उडवती तिरपीटत्रेधा

गाडी भलत्या रूळा
बदले चुकीचा सांधा
प्रवाह बदलेलं मार्ग
भेगा पाडतीलं बांधा

आंदोलनाचा रे रस्ता
मुळी ना सरळ साधा
विचार पूर्वक धोरण
इप्सित सद्हेतु साधा

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# थोर क्रांतिकारी संत श्री सेवालाल महाराज



आज १५ फेब्रुवारी, बंजारा समाजातील महान क्रांतिकारक संत श्री सेवालाल महाराज यांची २८६ वी जयंती. मध्ययुगात भारतात अनेक क्रांतिकारक संत महात्मे होऊन गेले ज्यांनी आपल्या आपल्या वर्तनातून, कीर्तनातून, विचारातून समाजात भक्तिभाव तर निर्माण केलाच पण येणाऱ्या अनेक पिढ्यांना मार्गदर्शन होईल असे तत्वज्ञान सांगितले त्यात श्री संत श्री सेवालाल महाराज हे एक होते. संत श्री सेवालाल महाराज यांचा जन्म १५ फेब्रुवारी १७३९ रोजी तांडा गुत्ती बेल्लारी अनंतपुर जिल्हा आंध्रप्रदेश या ठिकाणी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव भीमा नाईक असे होते. भीमा नाईक हे त्याकाळात अतिशय श्रीमंत व्यक्ती म्हणून ओळखले जात. असे म्हणतात की भीमा नाईक यांच्या घरी इतकी श्रीमंती होती की त्यांच्या सात पिढ्या बसून आरामात जेवण करतील. त्यांच्याकडे सुमारे पाच हजार बैल आणि गाया होत्या. ते ४१ तांड्यांचे नायक होते. घरी लक्ष्मी पाणी भरत असूनही सेवालाल महाराजांचे मन रमत नव्हते. आपल्या बंजारा समाजातील लोक जुन्या रूढी परंपरांना कवटाळून बसला असल्याने बंजारा समाज इतर समाजाच्या मानाने खूप मागे आहे. या समाजातील हाच मागासलेलापणा दूर करण्यासाठी काही तरी करावे असे त्यांना सतत वाटत होते. त्यांच्या आई धर्मली यांनी त्यांना लहानपणीच वीरांच्या गोष्टी सांगितल्या होत्या. आईच्या शिकवणुकीचा त्यांच्यावर खूप प्रभाव होता. आपल्या बंजारा समाजात अनेक अनिष्ट चालीरिती आहेत. या अनिष्ट चालीरिती मुळेच समाज मागे आहे हे त्यांनी जाणले. बंजारा समाजाला इतर समाजाच्या बरोबरीने न्यायचे असेल तर त्यांच्यात असणाऱ्या अनिष्ट, बुरसटलेल्या चालीरिती बंद करून त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण केला पाहिजे असा विचार करून त्यांनी समाजामध्ये जनजागृती केली. बंजारा समाजातील बांधवांनी अंधश्रद्धेला मूठमाती द्यावी असा त्यांचा आग्रह असायचा. अंधश्रद्धेमुळेच समाज मागे आहे असे त्यांचे ठाम मत होते. कोणत्याही गोष्टीवर डोळे झाकून विश्वास ठेवू नका. कोणतीही गोष्ट पारखून, समजून घ्या मगच विश्वास ठेवा असे ते म्हणत. त्यांना गरीब - श्रीमंत, स्त्री - पुरुष असा भेदभाव मान्य नव्हता म्हणूनच घरची श्रीमंती असूनही त्यांनी आपल्या पुतण्याच्या विवाह एका गरीब कुटुंबातील मुलीशी लावून दिला होता. २५० वर्षापूर्वीच श्री संत सेवालाल महाराजांनी स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्वाची शिकवण समाजाला दिली होती. श्री संत सेवालाल महाराज हे केवळ थोर विचारवंतच नव्हते तर ते एक थोर सेनानीही होते. दिल्लीचा नवाब गुलाब खान मोहंमद खान याच्याशी सेवालाल महाराज यांच्याशी लढाई झाली या लढाईत सेवालाल महाराजांनी मर्दुमकी गाजवत विजय मिळवला. श्री संत सेवालाल महाराजांनी भारतीय स्वातंत्र्याचा जाहीरनामा तयार केला त्यावेळी उमाजी नाईक, तंट्या भिल्ल यासारखे शुर सेनानी त्यांच्यासोबत होते. भारतीय इतिहासातील थोर विचारवंत आणि थोर सेनानी अशी ओळख असलेल्या श्री संत सेवालाल महाराजांचे २ जानेवारी १७७३ रोजी रुईगड, तालुका मानोरा जिल्हा वाशिम येथे निधन झाले. थोर विचारवंत, समाजसेवक त्याच सोबत शुर सेनानी असणाऱ्या श्री संत सेवालाल महाराजांचे विचार आजच्याच पिढीला नव्हे तर येणाऱ्या अनेक पिढ्यांना प्रेरणा देणारे आहे. त्यांचे विचार आत्मसाद करून त्या विचारांवर चालण्याचा संकल्प करणे हीच त्यांच्या जन्मदिनी त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.

**थोर विचारवंत, थोर सेनानी श्री संत सेवालाल महाराजांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!**

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## नवी मुंबई आरटीओ कार्यालयाकडून रिक्षा मिटर टेरिफ कार्ड वाटप



**अक्षराज : गणेश जाधव,**

**दि.१४ : नेरूळ (नवी मुंबई) :** दिनांक ०१ फेब्रुवारी २०२५ रोजी रिक्षा मिटर ३ रुपयांनी वाढला असून शुक्रवार, दिनांक १४ फेब्रुवारी २०२५ तारीख आली तरी रिक्षा मिटरचे कॅलिब्रेशन चालू झालेले नसल्याकारणाने प्रवास व रिक्षा चालक यांच्यात वादविवाद चालू झालेत. तशा प्रकारच्या अनेक तक्रारी आरटीओ कार्यालय नवी मुंबई या ठिकाणी दाखल झाल्याचे आढळून आले. त्या संबंधित होणारे वादविवाद टाळण्यासाठी उपाययोजना करण्यासाठी अनेक संघटनांनी दिनांक ०१ फेब्रुवारी ते १३ फेब्रुवारी या दरम्यान उपप्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन गावंडे यांच्याशी संपर्क केला. एक कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून आज उपप्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन गावंडे व रिक्षा परमिट विभागाचे सिनियर क्लर्क देवकर यांनी नवी मुंबई येथील रिक्षा युनियनचे पदाधिकारी व खास करून दैनिक अक्षराज प्रतिनिधी यांना आरटीओ कार्यालय नेरूळ या ठिकाणी बोलावून रिक्षा चालक व प्रवासी यांच्यातील वाद टाळावा. म्हणून परिवहन कार्यालयातर्फे १० हजार रिक्षा मिटर टेरिफ कार्ड वाटप केले. या प्रसंगी रिक्षा संघटनांचे पदाधिकारी सुनील बोर्डे, विजय पाटील, संतोष चर्हाटे, युवराज पाटील, सुरेश काळे, धनंजय पाटील, सचिन लकडे व इतर मान्यवर सदस्य उपस्थित होते.

## वेसवी ग्रुप ग्रामपंचायत येथे बेटी बचाओ बेटी पढाओ कार्यक्रम संपन्न



**अक्षराज : उमेश तबिब**

**दि.१४, दापोली (रत्नागिरी) :** मंडणगड तालुक्यातील एकात्मिक बालविकास सेवा योजना अंतर्गत बीट उमरोली येथील पर्यवेक्षिका एस.बी.कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली बेटी बचाओ बेटी पढ़ाओ कार्यक्रम ग्रुप ग्रामपंचाय वेसवी येथे साजरा करण्यात आला. वेसवी ग्रुप ग्रामपंचायत सरपंच प्रवीण खाडे व ग्रुप ग्रामपंचायत सदस्य विमल वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. बेटी बचाव बेटी पढाव ही केंद्र सरकारने सुरू केलेली योजना आहे. मुलीचा जन्मदर वाढविणे लिंग निवडीस प्रतिबंध करणे बालिका भ्रूणहत्या रोखणे बालविवाह रोखणे मुलीचे शिक्षण व आरोग्य यामध्ये सुधारणा घडवून आणणे मुलानं इतकाच मुलींचा सन्मान करणे, मुलीच्या जन्मा बाबत समाजामध्ये सकारात्मक विचार करणे, मुलीच्या शिक्षणास प्रोत्साहन देणे, इत्यादी विषयी माहिती अंगणवाडी सेविका शलाका पवार यांनी दिली. तसेच लेक लाडकी योजना प्रभावीपणे राखण्याची जनजागृती करण्यात आली. लेक लाडकी योजनेची माहिती अंगणवाडी सेविका मानसी संसारी यांनी दिली. बेटी बचाओ बेटी पढाओप्रतिज्ञा अंगणवाडी सेविका निमा गमरे यांनी दिली. तसेच मुलींना करावयाचे संस्कार याविषयी के.वी.भाटे विद्यामंदिर शिक्षिका मोहिते यांनी दिली. रांगोळी प्रदर्शन अंगणवाडी सेविका अम्रीन लांबे, श्रुती चिले, पोषण आहार आशाताई मंजिरी पड्यालं, शितल पवार यांनी केले. बचत गट सीआरपी स्नेहल तांबे उपस्थित होत्या. बेटी बचाव बेटी पढाव जनजागृती के.वि.भाटे विद्यामंदिर वेसवी येथील विद्यार्थिनीने सहभाग घेतला. व सर्व सन्माननीय पालक वर्ग किशोरी मुली उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंगणवाडी सेविका शालाका पवार यांनी केले अंगणवाडी सेविकास निमा गमरे यांनी सर्वांचे आभार मानले.

## श्री ढोकेश्वर महाविद्यालयातील ४ मुलींची पोलिस दलात निवड



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१४, पारनेर (अहिल्यानगर) :** अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे श्री ढोकेश्वर महाविद्याल टाकळी ढोकेश्वर येथील महाविद्यालयातील ४ मुली आणि एका गुणवंत विद्यार्थ्यांची निवड पोलीस दलात झाली. ही महाविद्यालयाच्या दृष्टीने अतिशय कौतुकास्पद बाब आहे असे प्रतिपादन अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे कार्यकारिणी सदस्य डॉ.भाऊसाहेब खिलारी यांनी केले. महाविद्यालयाच्या वतीने डॉ.खिलारी यांच्या शुभहस्ते पोलीस दलात भरती झालेल्या आचल गायकवाड, सुचिता उंडे, तृषाली राऊत ,सायली वाळुंज आणि सचिन मोरे यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी डॉ.खिलारी पुढे म्हणाले की, महात्मा फुलेंनी स्त्री शिक्षणाचा पाया रचला, त्यांनी मुलींच्या शिक्षणासाठी प्रथम शाळा सुरू केल्या याचाच परिणाम म्हणून शिक्षण व इतर सर्व क्षेत्रात मुली आज उच्च पदावर कार्यरत आहेत. मुलींप्रमाणे मुलांनीही शिक्षण घेऊन अधिकारी बनावे असे अवाहन ही त्यांनी केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.लक्ष्मणराव मतकर यांनीही पोलीस दलात भरती झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन आणि कौतुक केले. श्री ढोकेश्वर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पोलिस दलात मारली भरारी ही महाविद्यालयाच्या दृष्टीने अतिशय अभिमानास्पद बाब आहे. अशाच प्रकारची प्रगती करून महाविद्यालयाचे, कुटुंबाचे आणि गावाचे नाव उज्वल करावे असे ही आवाहन प्राचार्य यांनी केले. पोलीस दलात भरती झालेल्या यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ.विवेक भापकर, सचिव ऍड.विश्वासराव आठरे, सहसचिव जयंत वाघ, खजिनदार ऍड.दिपलक्ष्मी म्हसे, ज्येष्ठ विश्वस्त सिताराम खिलारी यांनी केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते. प्रास्ताविक उपप्राचार्य प्रा.विरेंद्र धनशेट्टी यांनी केले तर आभार प्रा.लक्ष्मण कोठावळे यांनी मानले.

# जिल्ह्यात जल अभियानाची उत्साहात सुरवात

## २८ फेब्रुवारीपर्यंत गावांनी स्व नामांकन करण्याचे आवाहन




**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.१४, धाराशिव :** धाराशिव जिल्हा प्रशासन व वॉटर संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यात जल अभियानची उत्साहात सुरवात झाली आहे. दिनांक ०४ फेब्रुवारी २०२५ पासून जलअभियान व जल स्पर्धेचा भव्य शुभारंभ झाला. महाराष्ट्र शासनाचा पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, जिल्हा प्रशासन धाराशिव आणि वॉटर संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविला जात आहे. जलव्यवस्थापनासाठी स्पर्धात्मक वातावरणाला प्रोत्साहन देणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. ज्यामुळे जिल्ह्यातील गावे जलस्वयंपूर्ण होण्याकडे वाटचाल करू शकतील. ही स्पर्धा धाराशिव जिल्ह्यातील सर्व गावांसाठी खुली असून २८ फेब्रुवारी पर्यंत जलस्पर्धेत सहभागी होण्यासाठी स्व नामांकन करता येईल. धाराशिव जिल्हा नियोजन विभागाच्या सभागृहात पार पडलेल्या भव्य उद्घाटन सोहळ्याला धाराशिव जिल्ह्यातील अनेक गावांमधील एकूण २५० ग्रामस्थ उपस्थित होते. या जल अभियान आणि जलस्पर्धेचे उद्घाटन धाराशिव जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मैनाक घोष यांच्या हस्ते झाले. या जलस्पर्धेत मोठ्या प्रमाणात सहभागी होण्यासाठी त्यांनी याप्रसंगी गावकर्यांना आवाहन केले.

प्रास्ताविकपर भाषणात वॉटर संस्थेचे डॉ. ईश्वर काळे यांनी स्पर्धेचा उद्देश, कार्यपद्धती आणि गावांच्या मूल्यांकनाची पद्धत विशद केली. वॉटर संस्थेने विकसित केलेल्या जलकारभारचे मानक (वॉटर गवर्नन्स स्टँडर्ड) या पद्धतीनुसार गावांच्या जलव्यवस्थापनाचे मूल्यमापन होणार आहे. याप्रसंगी उपविभागीय कृषी अधिकारी श्री. महादेव आसलकर, आत्माचे प्रकल्प संचालक खंडेराव सराफ, जिल्हा नियोजन अधिकारी अर्जुन झाडे, जल संधारण अधिकारी चंद्रकांत राऊळ, स्वच्छ भारत अभियानचे प्रकल्प अधिकारी हनुमंत गादगे, टाटा सामाजिक विज्ञान संस्थेचे प्रा.गणेश चादरे, ग्रामविकास समिती सचिव दिपाली जाधव, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचे खंदारे आदींनी गावकर्यांना मार्गदर्शन करुन व स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले.

धाराशिव जिल्ह्यातील या जलअभियानाच्या दरम्यान येणारे अनुभव आणि धडे यांच्या आधारावर वॉटर संस्थेने विकसित केलेल्या जलकारभाराच्या मानकाची अंमलबजावणी राज्यस्तरावर करणे हा या अभियानाचा मुख्य हेतू आहे. वॉटर संस्थेच्या पुणे कार्यालयाचे जयंत पाटील आणि धाराशिव विभागाचे प्रमुख अभिजित कवठेकर यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन केले गेले होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अरुण डहाळे, आदेश ठोंबरे, तुषार सूर्यवंशी, कांतीलाल गीते, विष्णू खेडकर, अनिल हिवाळे व वॉटर संस्थेच्या इतर सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

### अशी आहेत बक्षिसे

वॉटर संस्था आणि संस्थेच्या वॉटर सेंटर फॉर रेजिलिएन्स स्टडीज (W-CReS) या संशोधन केंद्राने विकसित केलेल्या वॉटर गवर्नन्स स्टँडर्ड या टूलच्या आधारावर स्पर्धेतील सहभागी गावांचे मूल्यांकन केले जाईल. वॉटर गवर्नन्स स्टँडर्ड टूलच्या मूल्यांकनाद्वारे मिळणार्या वॉटर स्कोअरच्या आधारावर निवडलेल्या ३ गावांना रोख बक्षिसे व स्मृतीचिन्ह प्रथम - ५ लाख रुपये, व्दितीय - ३ लाख रुपये आणि तृतीय १ लाख रुपये मिळणार आहेत. तसेच स्पर्धेतील सर्व सहभागी गावांना त्यांचे जल व्यवस्थापन सुधारण्यासाठी नियोजन आराखडे मिळणार आहेत.

# आरपीआय तर्फे एक दिवसीय धरणे आंदोलन संपन्न



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१४, नागपूर :** चिचोली (खापरखेडा) जिल्हा परिषद सर्कल मधील नागरिक अनेक मूलभूत सुविधां पासून वंचित आहे. या समस्या त्वरित सोडवाव्यात अन्यथा १५ दिवसानंतर पुन्हा तीव्र आंदोलन करण्यात येईल असे आरपीआयद्वारे आयोजित एक दिवसीय लक्षवेधी धरणे आंदोलन प्रसंगी आरपीआय नेते पृथ्वीराज बोरकर व राहुल बागडे यांनी मत व्यक्त केले. जनतेच्या विविध समस्या सोडविण्यासाठी व शासन प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी शुक्रवार, दिनांक १४ फेब्रुवारी २०२५ रोजी एक दिवसीय धरणे प्रदर्शन खापरखेडा येथे करण्यात आले. यावेळी प्रमुख मागण्याची माहिती देण्यात आली त्यात -

(१) खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रामध्ये स्थानिक सुशिक्षित, अशिक्षित, बेरोजगार युवक/युवतींना कंत्राटी रोजगार देणे (२) चिंचोली, खापरखेडा, भानेगाव, चनकापुर येथील आबादी वस्ती मधील रहीवासियांना मालकी पट्टे वाटप करणे (३) खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र येथील मेन रोडला लागून पडिक असलेल्या रोपवे व जॉर्ज कॉलोनीच्या जागेवर गावातील जनतेकरीता खेळाचे मैदान, बस स्टॉप, बगिचा, सार्वजानिक शौचालय महाजनकोच्या फंडाद्वारे बांधकाम करणे (४) खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र मध्ये स्थानिक लहान कंत्राटदारांना प्राधान्याने कामे देणे (५) चिंचोली खापरखेडा येथे ग्रामीण रुग्णालय मंजुर करणे(६) नविन बिना ते रेल्वे चौकी खापरखेडा दरम्यान शाळेच्या विद्यार्थ्यांना जाण्या-येण्या करीता मुख्य मार्गालगत महाजनको फंडा द्वारे सर्विस रोड तयार करणे (७) खापरखेडा रेल्वे उड्डाण पूलाचे बांधकाम त्वरीत सुरू करणे (८) औष्णिक विद्युत केंद्रामुळे जल, वायू व जमिनीचे प्रदूषनाचा मार झेलत असलेल्या चिचोली (खापरखेडा), भानेगाव या गावाना महाजेनकोने दत्तक घेवुन गावातील नागरिकांना सर्व प्रकारच्या मूलभूत सुविधा पुरविणे (९) खापरखेडा येथील झुडपी जंगल राखीव असलेल्या कोराडी रोडवरील १४ एकर जागेवर इको पार्कची निर्मिती करणे (१०)खापरखेडा येथे जल जिवन मिशन अंतर्गत पिण्याचे पाणी पुरवठा योजना त्वरीत पूर्ण करणे (११) भानेगाव कोळसा खाणीमुळे बाधीत प्रकल्पगस्त गावातील नागरिकांचे त्वरित पुनर्वसन करणे (१२) औष्णिक विद्युत केंद्र खापरखेडा परिसरातील पडीक व मोकळ्या जागेवर वृक्ष लागवड व देखभाल कामाकरिता महिला बचत गटांना वाटप करणे. (१३) चिचोली खापरखेडा ग्रामपंचायतच्या सर्वांगीण विकासासाठी नगरपंचायत त्वरित घोषित करण्यात यावी. धरणे आंदोलनात मोठ्या संख्येने चिचोली (खापरखेडा), भानेगाव, बिना, चनकापूर आदी गावातील महिला, नागरिक, युवक, सहभागी झाले होते.

यावेळी बीजेपी, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, इत्यादी पक्षाचे नेते सहभागी झाले होते. या आंदोलनात आरपीआय नेते राहूल बागडे, माजी सरपंच प्रकाश लांजेवार, पृथ्वीराज बागडे, सविता नारनवरे, किरण शेंडे, माजी उपसरपंच अस्मिता बागडे, धीरज देशभ्रतार, बीजेपी नेते शांताराम गावंडे, रमेश जैन, शामराव सरोदे, बळी गायकवाड, चंद्रशेखर पानतावणे, राष्ट्रवादी काँग्रेसचे अमर जैन, शिवसेनेचे अशोक झिंगरे, यांच्यासह भानेगाव उपसरपंच सोनुताई बोरकर, संजय बनसोड, अंतकला गाडेकर, राजू देशभ्रतार, रामराव मेश्राम, शरद पाटील, हरिश्चंद्र तिरपुडे, मनोहर डोंगरे, यांनी धरणे आंदोलनात मार्गदर्शन केले. धरणे आंदोलन स्थळी खापरखेडा विद्युत केंद्राचे उपमुख्य अभियंता(प्रशासन) नारायण राठोड, कल्याण अधिकारी आनंद वाघमारे यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून मागण्याचे निवेदन स्वीकारले व त्वरित सोडविण्यासाठी आश्वासन दिले. यावेळी आरपीआय प्रभारी राहुल बागडे यांनी आंदोलनाचा पुढील कृती कार्यक्रम जाहीर केला. धरणे आंदोलन यशस्वी करण्यासाठी धीरज देशभ्रतार, अभिषेक शेंडे, राजकीरण शेंडे, सुरेश नागदवणे, विलीन बागडे, धम्मदीप झोडापे, त्रिशरण कुऱ्हाडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# जिल्हा परिषद, ठाणे शिक्षण विभागाकडून ५२ शिक्षकांना पदोन्नतीचा लाभ



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१४, ठाणे :** जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत शिक्षण विभागातील विस्तार अधिकारी (शिक्षण) वर्ग ३ श्रेणी ३ या पदासाठी केंद्रप्रमुख / मुख्याध्यापक / शिक्षक संवर्गातून ११ पात्र शिक्षकांना पदोन्नती देण्यात आली व मुख्याध्यापक पदावर ४१ पात्र शिक्षकांना पदोन्नती देण्यात आली. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली पदोन्नती देण्यात आली आहे.शिक्षणाधिकारी बाळासाहेब राक्षे, अधीक्षक सारासे बी.ए. गोमासे, विस्तार अधिकारी (शिक्षण) आशिष झुंजारराव तसेच शिक्षण विभागातील सहाय्यक प्रशासन अधिकारी, कनिष्ठ प्रशासन अधिकारी व कर्मचारी यांनी यासाठी प्रयत्न केले. या कार्यक्रमात शिक्षक व शिक्षण विभागातील अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिक्षकांना दिल्या जाणाऱ्या विविध लाभाबाबत विशेष पाठपुरावा वेळोवेळी मुख्य कार्यकारी अधिकारी घेत असल्याने शिक्षण विभागातील ५२ शिक्षकांना पदोन्नतीचा लाभ देण्यात आला आहे. याबाबत संबंधित शिक्षक व शिक्षक संघटना यांनी समाधान व्यक्त केले. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे यांचे आभार व्यक्त केले आहेत.

# विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांच्याकडून विमानतळाची पाहणी




**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१४, अकोला :** विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांनी शुक्रवार, दिनांक १४ फेब्रुवारी २०२५ रोजी अकोला येथील शिवणी विमानतळ व डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाला भेट देऊन पाहणी केली. जिल्ह्याच्या विमानतळ विकासासाठी लोकप्रतिनिधींकडून शासनाकडे पाठपुरावा होत आहे. त्या अनुषंगाने विमानतळ येथे सद्य:स्थितीत उपलब्ध सुविधा व आवश्यकता याबाबत आढावा विभागीय आयुक्तांनी घेतला. उपविभागीय अधिकारी डॉ.शरद जावळे यावेळी उपस्थित होते. विमानतळ येथील धावपट्टी, इमारत, कार्यालय, स्वच्छतागृहे, वाहनतळ आदी अनेक सुविधांची पाहणी व विमानतळ अधिकारी-कर्मचा-यांशी चर्चा करून विविध विषयांचा आढावा विभागीय आयुक्तांनी यावेळी घेतला. डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठालाही श्रीमती सिंघल यांनी भेट घेऊन तेथील हॉर्टिकल्चर व विविध प्रकल्पांची पाहणी केली. त्यांनी यावेळी संशोधक-तज्ज्ञांशी चर्चा करून तेथील कृषी प्रात्यक्षिकांची पाहणी केली. विद्यापीठातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

